# मिरा भाईंदर महानगरपालिका

**अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग**

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-४०११०१ दुरध्वनी क्रं.२८१९२८२८


**जा.क्र.मनपा/अवि/ ५०२ /2023-24** **दि. ३१/ १०/ २०२३**

प्रति,
सिस्टिम मॅनेजर,
माहिती व तंत्रज्ञान विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत नेमण्यात आलेल्या ठेक्याची माहिती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ :- मा. उप- आयुक्त (मु.) यांचे जा. क्र. मनपा/ आस्था/ 1802/ 2023-24 दि.30/10/2023 रोजीचे परिपत्रक.

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, मिरा भाईंदर महानगरपालिका अतिक्रमण/ अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभागामार्फत मिरा - भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील अनाधिकृत बांधकामे, अतिक्रमणे, धोकादायक इमारती निष्कासित करणे व अनधिकृत फेरीवाले हटविणेकामी एक वर्ष मुदतीकरीता आवश्यकतेनुसार यंत्रसामुग्री, वाहने व मनुष्यबळ उपलब्ध करणे कामाचा ठेका मे. श्री बालाजी ट्रान्सपोर्ट प्रा.लि. या ठेकेदारास जा.क्र.मिभा/मनपा/अवि/298/2023-24 दि.01/08/2023 अन्वये देण्यात आलेला आहे.

तरी सदर ठेक्याचे कार्यादेश व करारनामाची प्रत मनपाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकरीता सोबत जोडून देण्यात येत असून सदरची माहिती मनपाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावी, हि विनंती आहे.

(नरेंद्र चव्हाण)
सहायक आयुक्त तथा
विभाग प्रमुख (अतिक्रमण निर्मुलन)
मिरा भाईंदर महानगरपालिका

जा. क्र. मिभा / मनपा / अवि / ९८८/2023-24 / C

दिनांक: 9/८/2023

// कार्यादेश //

प्रति,
मे. श्री बालाजी ट्रान्सपोर्ट,
शिवप्रसाद लंच होम जवळ,
रोड नं.16, वागळे ईस्टेट,
ठाणे-400604

विषय :- मिरा - भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील अनाधिकृत बांधकामे, अतिक्रमणे, धोकादायक इमारती निष्कासित करणे व अनधिकृत फेरीवाले हटविणेकामी एक वर्ष मुदतीकरीता आवश्यकतेनुसार यंत्रसामुग्री, वाहने व मनुष्यबळ उपलब्ध करणे कामाचे कार्यादेश देणेबाबत. (टेंडर आय डी :- 2022_MBMC_860340_1)

संदर्भ :-
1) जा.क्र.मनपा/अवि/513/2022-23 दि.16/12/2022 रोजीची फेर निविदा सुचना.
2) आपली दि.10/01/2023 पर्यंत प्राप्त निविदा.
3) मा. प्रशासकीय, ठराव क्र.57, दि.18/05/2023 अन्वये मंजुरी
4) निविदा स्विकृती पत्र क्र. जा.क्र.मनपा/अवि/158/2023-24 दि.14/06/2023
5) सुरक्षा अनामत रक्कम रु.25 लाखाची कर्नाटक बँक लि. ची बँक गॅरंटी क्र.23770BG000014 दि.27/06/2023
6) दि.01/08/2023 रोजीचा करारनामा.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील अतिक्रमण/ अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभागाच्या अनाधिकृत बांधकामे, अतिक्रमणे, धोकादायक इमारती निष्कासित करणे व अनधिकृत फेरीवाले हटविणेकामी एक वर्ष मुदतीकरीता आवश्यकतेनुसार यंत्रसामुग्री, वाहने व मनुष्यबळ उपलब्ध करणे कामाकरीता आपण सादर केलेली खालील नमूद दराची निविदा स्विकारणेस मा. प्रशासकीय ठराव क्र.57, दि.18/05/2023 अन्वये मंजुरी दिली आहे.

| निविदेतील बाबींचा अनु क्रमांक | तपशिल | मंजुर दर (सर्व करासहीत) प्रती 8 तास/ प्रती दिन (रु.) |
|---|---|---|
| १. | Mahindra Bolero Pickup | **2349.00** |

कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.
दूरध्वनी: 022-28192828 / 28193028 / 28181183 / 28181353 / 28145985
ईमेल: mbmcho@gmail.com वेबसाईट: www. mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

मुख्य कार्यालय

जा. क्र. मिभा / मनपा / /                                  दिनांक:

| | | |
|---|---|---|
| २. | Tempo (609) | 2800.00 |
| ३. | Tempo (909) | 2850.00 |
| ४. | Truck | 3050.00 |
| ५. | Dumper ( Hyve) | 5440.00 |
| ६. | Dumper | 4050.00 |
| ७. | Tractor with Breaker | 3200.00 |
| ८. | Tractor (with Trolley) | 3990.00 |
| ९. | Towing van (407) | 5050.00 |
| १०. | Towing van (1612) | 5800.00 |
| ११. | J.C.B.(3DX) | 6600.00 |
| १२. | J.C.B. (3DX) With Breaker | 6800.00 |
| १३. | Poclain (70) | 9000.00 |
| १४. | Poclain (80) | 9080.00 |
| १५. | Poclain (210) | 10050.00 |
| १६. | Poclain (210) With Breaker | 12800.00 |
| १७. | Poclain (300) | 18500.00 |
| १८. | Poclain (300) with Breaker | 18500.00 |
| १९. | Compressor with Breaker | 3200.00 |
| २१. | Gas Cutter | 3350.00 |
| २२. | Electric R.C.C. Slab Cutter | 4000.00 |
| २४. | Farana 16 Ton | 9999.00 |
| २५. | Crane 50 Ton | 23000.00 |
| २६. | Crane 100 Ton | 34000.00 |
| २७. | To provide manpower as required to take action against encroachment, unauthorized construction, dangerous buildings and unauthorized street hawkers. (including breaking material) | 979.10 |

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION**

कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

दूरध्वनी: 022-28192828 / 28193028 / 28181183 / 28181353 / 28145985

ईमेल: mbmcho@gmail.com वेबसाईट: www. mbmc.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**मुख्य कार्यालय**

जा. क्र. मिभा / मनपा / /  दिनांकः________

सदर कामी दि.10/08/2023 रोजी पासून निविदेतील व आपणांस सोबत झालेल्या करारनाम्यातील अटीशर्ती नुसार अनाधिकृत बांधकामे, अतिक्रमणे, धोकादायक इमारती निष्कासित करणे व अनधिकृत फेरीवाले हटविणेकामी आवश्यकतेनुसार यंत्रसामुग्री, वाहने व मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात यावे. सदर कंत्राटाची मुदत 1 वर्ष म्हणजे दि.10/08/2023 ते दि.09/08/2024 पर्यंत राहील.

(मारुती गायकवाड)
उप-आयुक्त (अतिक्रमण निर्मुलन)
मिरा भाईंदर महानगरपालिका

O/C

01/08/2023

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## करारनामा

कामाचे नाव :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे / अतिक्रमणे / धोकादायक बांधकामे निष्कासित करणे व अनधिकृत फेरीवाले हटविणेकामी मन्युष्यबळ, यंत्रसामुग्री व वाहने भाडेतत्वावर एक वर्ष मुदतीकरीता पुरविणे

कंत्राटदाराचे नाव :- मे. बालाजी ट्रान्सपोर्ट
शिवप्रसाद लंच होम जवळ,
रोड नं.१६, वागळे ईस्टेट,
ठाणे -४००६०४

# करारनामा

| | |
|---|---|
| करारनामा लिहून देणार :- | मे. बालाजी ट्रान्सपोर्ट<br>शिवप्रसाद लंच होम जवळ, रोड नं.१६, वागळे ईस्टेट, ठाणे -४००६०४. |
| करारनामा लिहून घेणार :- | उप-आयुक्त (अतिक्रमण निर्मुलन)<br>मिरा भाईंदर महानगरपालिका |

कारणे करारनामा लिहुन देण्यात येतो की, ................

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे / अतिक्रमणे / धोकादायक बांधकामे निष्कारित करणे व अनधिकृत फेरीवाले हटविणे कामी मन्युष्यबळ, यंत्रसामुग्री व वाहने भाडेतत्वावर एक वर्ष मुदतीकरीता पुरविणे या कामाकरीता करारनामा लिहून देणार यांचेखाली नमूद केल्याप्रमाणे निविदेतील दर(टेंडर आय डी :- 2022_MBMC_ 860340_1) मा. प्रशासकीय ठराव क्र.५७, दि.१८/०५/२०२३ अन्वये मंजूर करण्यात आले आहेत. त्यानुसार काम पूर्ण करुन देण्याची जबाबदारी करारनामा लिहून देणार यांची राहील.

## -: अनुसुची :-

| निविदेतील बार्बीचा अनु क्रमांक | तपशिल | मंजुर दर (सर्व करासहीत) प्रती ८ तास/ प्रतीदिन |
|---|---|---|
| १. | Mahindra Bolero Pickup | **2349.00** |
| २. | Tempo(609) | **2800.00** |
| ३. | Tempo(909) | **2850.00** |
| ४. | Truck | **3050.00** |
| ५. | Dumper ( Hyve) | **5440.00** |
| ६. | Dumper | **4050.00** |
| ७. | Tractor with Breaker | **3200.00** |
| ८. | Tractor (with Trolley) | **3990.00** |
| ९. | Towing van (407) | **5050.00** |
| १०. | Towing van (1612) | **5800.00** |
| ११. | J.C.B.(3DX) | **6600.00** |
| १२. | J.C.B. (3DX) With Breaker | **6800.00** |
| १३. | Poclain (70) | **9000.00** |
| १४. | Poclain (80) | **9080.00** |
| १५. | Poclain (210) | **10050.00** |
| १६. | Poclain (210) With Breaker | **12800.00** |
| १७. | Poclain (300) | **18500.00** |

| | | |
|---|---|---|
| १८. | Poclain (300) with Breaker | 18500.00 |
| १९. | Compressor with Breaker | 3200.00 |
| २१. | Gas Cutter | 3350.00 |
| २२. | Electric R.C.C. Slab Cutter | 4000.00 |
| २४. | Farana 16 Ton | 9999.00 |
| २५. | Crane 50 Ton | 23000.00 |
| २६. | Crane 100 Ton | 34000.00 |
| २७. | To provide manpower as required to take action against encroachment, unauthorized construction, dangerous buildings and unauthorized street hawkers. (including breaking material) | 979.10 |

## अटीशर्ती

१) अनधिकृत बांधकामे / अतिक्रमणे / धोकादायक बांधकामे निष्कासित करणेव अनधिकृत फेरीवाले हटविणेकामी मन्युष्यबळ, यंत्रसामुग्री व वाहने भाडेतत्वावर पुरविण्याबाबत निविदेचा कालावधी कार्यादेशाच्या दिनांक पासून एक वर्षांचा राहील.

२) अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभागासाठी पुरविण्यात येणारी वाहने व यंत्रसामुग्री प्रादेशिक परिवहन अधिकारी (आर.टी.ओ.) कार्यालयाकडे नोंदणीकृत असावे व त्यास आवश्यकते वाहतूकीचे सर्व अद्यावत परवाने प्राप्त असणे आवश्यक आहे. प्रादेशिक परिवहन अधिकारी (आर.टी.ओ.) कार्यालय किंवा इतर संबंधीत तत्सम शासकीय कार्यालयाकडील सर्व नोंदणीची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

३) उपलब्ध करण्यात येणा-या वाहनांचा आर.टी.ओ टॅक्स, इंधन खर्च, देखभाल खर्च व इतर कोणत्याही अनुषगीक खर्चाची जबाबदारी निविदाकाराची राहील.

४) उपलब्ध करुन देण्यात येणा-या वाहनांवरील वाहन चालकांकडे योग्य ते परवाने असणे आवश्यक आहे. याबाबतची सर्व जबाबदारी निविदाकाराची राहील. यासंदर्भात उद्भवणा-या कोणत्याही प्रकारच्या कायदेशीर कारवाईस मिरा भाईंदर महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

५) वाहनांच्या अनुषंगाने विमा, आर.टी.ओ.पोलीस विभाग अथवा शासकीय कार्यालये यांचेकडून कोणतीही कायदेशीर अथवा अन्य कारवाई केल्यास त्याची संपूर्णपणे जबाबदारी निविदाकाराची राहील व त्यासाठी येणारा खर्च हा निविदाकारास करावा लागेल.

६) तोडक कारवाई करते वेळीस उपलब्ध करुन देण्यात येणा-या यंत्रसामुग्री / वाहने तसेच पुरविण्यात आलेले कुशल / अकुशल कामगार व सुपरवायजर यांचा किंवा इतर व्यक्तिंचा अपघात झाल्यास, मनुष्यहानी झाल्यास त्याची सर्व जबाबदारी निविदाकाराची राहील. मा. न्यायालयाकडून भरपाई अथवादंड लादल्यास त्याची जबाबदारी निविदाकाराची असेल व मा. न्यायालयाचा निर्णय निविदाकारास बंधनकारक राहील.

७) पुरविण्यात येणारी यंत्रसामुग्री / वाहने सुस्थितीत असावीत. कारवाईचे वेळी यंत्रसामुग्री / वाहने सुस्थितीत नसल्याचे आढळून आल्यास सदर यंत्रसामुग्री / वाहनांचे भाडे अदा करण्यात येणार नाही व झालेल्या खोळंब्यास निविदाकाराला जबाबदार धरण्यात येईल. तसेच त्याकरीता दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार उपआयुक्त, अतिक्रमण/ अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग यांचे असतील.

८) अतिक्रमण/ अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभागाचे उप-आयुक्त/ सहायक आयुक्त/ संबंधित प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त यांच्या आदेशानुसार निविदाकाराने मनुष्यबळ, यंत्रसामुग्री, व वाहनांचा पुरवठा करावा लागेल. पुरवठा न केल्यास महानगरपालिका इतर कोणत्याही पुरवठादाराकडुन मनुष्यबळ, यंत्रसामुग्री, व वाहनेभाड्याने घेईल आणि त्यासाठी होणारा खर्च सुरक्षा अनामत रक्कमे मधून अथवा देयकातुन व इतर कोणत्याही कायदेशीर पध्दतीने मंजुर पुरवठादारा कडून वसुल केला जाईल.

९) निविदेत नमूद सर्व बाबी दैनंदिनरित्या भाडयाने घेणे महापालिकेस बंधनकारक राहणार नाही. आवश्यकता असेल त्यावेळी मागणी करण्यात येईल. याबाबतीत कोणतीही भरपाई दिली जाणार नाही.

१०) मनुष्यबळ / यंत्रसामुग्री / वाहने पुरवठा केल्यानंतर त्याचे बील सादर केल्यानंतर रक्कम अदा करण्यात येईल, सदर बीलाच्या अनुषंगाने पुरवठयाच्या चलनावर संबधित अधिकारी, यांच्याकडून प्रमाणित करुन घेवून त्यांची स्वाक्षरी असणे आवश्यक राहील.तसेच निविदाधारकामार्फत पुरविण्यात येणा-या वाहनांचे लॉगबुक मध्ये दैनंदिन नोंदी घेण्याची व संबंधित अधिका-याकडून या नोंदी साक्षांकित/ प्रमाणित करुन घेण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

११) तातडीच्या प्रसंगी / आपत्कालीन परिस्थितीत रात्रीच्या वेळी मागणी केल्यानंतर तातडीने मनुष्यबळ / यंत्रसामुग्री / वाहने पुरविणे आवश्यक राहील.तसेच रविवारी व सार्वजनिक सुट्यांच्या दिवशी मनुष्यबळ/ यंत्रसामुग्री / वाहनांचा पुरवठा करणे निविदाकारास बंधनकारक राहील.त्याकरीता जास्तीचे देयक अदा केले जाणार नाही.

१२) मनुष्यबळ / यंत्रसामुग्री / वाहनांसाठी एका दिवसाचे दर हे आठ तासासाठी असतील. सदरचे कामाचे तास निश्चित नसून संबंधीत अधिका-याने सुचविलेल्या वेळेनुसार, सुचविलेल्या ठिकाणी आवश्यकतेनुसार मनुष्यबळ / यंत्रसामुग्री / वाहने उपलब्ध करुन द्यावे लागतील. आठ तासानंतर जादा कालावधीसाठी मनुष्यबळ / यंत्रसामुग्री / वाहने वापरल्यास त्याचे प्रत्यक्ष तासानुसार (आठ तासांचे दराचे प्रत्येकी तासाचे देयक विभागुन) देयक अदा केले जाईल.

१३) महानगरपालिका अधिकारी यांचेकडून मागणी केल्या नुसार मनुष्यबळ / यंत्रसामुग्री / वाहने उपलब्ध न झाल्यास प्रतीदिनरु.१०,०००/- दंड आकारण्यात येईल. तसेच मनुष्यबळ / यंत्रसामुग्री / वाहने बाहेरुन उपलब्ध करुन घ्यावे लागल्यास त्यापोटी येणारा सर्व खर्च संबंधित निविदाकाराकडून वसूल करण्यात येईल.

१४) यंत्रसामुग्री / वाहने उपलब्ध करताना ऑपरेटर / वाहनचालकासह उपलब्ध करण्यात यावे. सदर मनुष्यबळाची मजुरी / पगार महापालिकेकडून स्वतंत्रपणे दिली जाणार नाही. निविदा दरामध्ये याचा समावेश करण्यात आलेला आहे.

मोठ्या कारवाईच्या वेळी एका वेळेरा जास्तीत जास्त साहित्य पुरवठा करणे बाबत संबंधीत अधिका-याने सूचना केल्यास त्यानुसार निविदाकारास वेळेवर यंत्रसामुग्री व मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

१६) अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग व्यतिरिक्त मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अन्य विभागाकडून मनुष्यबळ / यंत्रसामुग्री / वाहने यांची मागणी केल्यास मंजूर दराप्रमाणे पुरवठा करावा लागेल. त्यासाठी स्वतंत्र करारनामा करावा लागेल.

१७) निविदाकाराकडून पुरविण्यात येणा-या मशिनरीसाठी लागणारे इंधन व अनुषंगीक साहित्य याचा खर्च निविदाकाराने स्वतः करावयाचा आहे. यासाठी होणारा खर्च मनपाकडून स्वतंत्रपणे दिला जाणार नाही.

१८) निविदाकाराकडून पुरविण्यात येणारी मशिनरीकरिता लागणारे कुशल / अकुशल कामगार व सुपरवायझर यांच्यावर होणारा पगार अथवा मजूरीचा खर्च निविदाकाराने करावयाचा आहे. यासाठी होणारा खर्च स्वतंत्रपणे दिला जाणार नाही.

१९) निविदाकाराकडून पुरविण्यात आलेल्या यंत्रसामुग्री / वाहने तसेच कुशल / अकुशल कामगार व सुपरवायजर यांचा अपघातीविमा व नियमानुसार इतर विमा पॉलिसी उतरविण्याची जबाबदारी निविदाकाराची राहिल.तसेच त्यांचा अपधात झाल्यास त्याची जबाबदारी निविदाकाराची राहिल. याबाबतची कोणत्याही स्वरुपाची भरपाई अथवा खर्च करण्याची जबाबदारी मिरा भाईंदर महानगरपालिकेची असणार नाही.

२०) अतिक्रमण/ अनधिकृत बांधकामावर कारवाई करतांना आवश्यक ती खबरदारी निविदाकाराने घ्यावयाची असून आजुबाजूच्या मालमत्तेचे अथवा सार्वजनिक मालमत्तेची नुकसान झाल्यास त्याबाबतची भरपाई करण्याची जबाबदारी निविदाकाराची राहिल. सदर नुकसान भरपाई न केल्यास निविदाकाराच्या देयकातून कपात करण्यात येईल.

२१) निविदेचा कालावधी संपल्यानंतर आवश्यकता भासल्यास नविन निविदा मंजूर होईपर्यंत निविदाकारास सदर निदिदेतील मंजूर दराने व अटी / शर्तीनुसार कामकरणे बंधनकारक राहिल. महापालिकेच्या लेखी आदेशाशिवाय काम बंद केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

२२) सदर कामासाठी नियुक्त केलेल्या कुशल / अकुशल कामगार, सुपरवायजर यांना मिनिमम वेजेस ॲक्ट-१९४८ प्रमाणे किमान वेतन व इतर अनुषंगीक लाभ व भत्ते देण्याची जबाबदारी निविदा काराची असेल. तसेच कामगार विषयी सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करण्याची जबाबदारी निविदाकाराची राहील.

२३) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१९/ प्र.क्र.१३/ कामगार-८, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९ मधील शासन निर्देशाचे पालन करणे निविदाकारास बंधनकारक राहिल.

२४) निविदाकाराने कंत्राटी कामगारांना, कामाचे वेतन, पी.एफ., E.S.I.C व त्या अनुषंगीक इतर सर्व भत्ते किमान वेतन कायद्याप्रमाणे वेळोवेळी अदा करुन पुढील देयकासोबत प्रत जोडणे बंधनकारक राहिल.

२५) प्रत्येक कंत्राटी कामगारांचे बँक खाते उघडून पगार खात्यात जमा करणे. नेमलेल्या मनुष्यबळाचा कामाचा मोबदला संबंधिताच्या बँकेत जमा करण्याची जबाबदारी निविदाकाराची राहील.

२६) कामगारांच्या हजेरीसाठी निविदाकाराने कामगारांसाठी स्वतंत्र हजेरी नोंदवही ठेवणे बंधनकारक राहील. पुरविण्यात येणा-या मनुष्यबळाकरीता त्यांच्या खात्यामध्ये दरमहा १० तारीखेच्या आत वेतन अदा करुन त्याचा पुरावा देयकासोबत सादर केल्यानंतर देयक अदा केले जाईल. Voucher अथवा वेतन दिल्याची पावती सादर न केल्यास वेतन अदा केले जाणार नाही.

२७) कॉन्ट्रॅक्ट लेबर ॲक्ट १९७० व कॉन्ट्रॅक्ट लेबर नियम १९७१ अन्वये मंजूर निविदाकारास कामगार आयुक्त कार्यालयाचे आवश्यकते परवाने घेण्याची जबाबदारी निविदाकारावर राहील.

२८) सदर कामी नियुक्त केलेल्या कामगारांस / मजुरांस आवश्यक ते सर्व संरक्षण साहित्य पुरविण्याची जबाबदारी निविदाकाराची राहील.

२९) निविदाकार व मिरा भाईदर महानगरपालिका यामध्ये काही वाद निर्माण झाल्यास या संबधित मा. न्यायालय, ठाणे हे न्यायाधिकरण कार्यक्षेत्र राहिल.

३०) निविदाधारकास निविदा मुदतीपूर्वी रद्द करता येणार नाही, तथापि अशी परिस्थिती उद्भवल्यास पुर्वग्राह्य संमती शिवाय मा. आयुक्त निविदाधारकाची इसारा रक्कम जप्त करतील व निविदाधारकाची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्याच्या दंडात्मक कारवाईस निविदाधारक पात्र राहिल. त्याचप्रमाणे त्यांचे नाव काळ्या यादीत समाविष्ट करण्यात येईल.

३१) निविदाकाराने निविदा अटी / शर्ती व करारनाम्याचा भंग केला तर त्यांना कायदेशीर नोटीस देवून खुलासा प्राप्त करुन त्यांचे विरुध्द नियमाप्रमाणे कार्यवाही करण्याचा हक्क मिरा भाईंदर महानगरपालिकेस राहील.

३२) बाल मजुर कायदा नियमांचे पालन करणे निविदाकारावर बंधनकारक आहे. याबाबत महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

३३) कंत्राट कालावधीतील कामाबाबत कोणताही लेखा आक्षेप आल्यास वसुली निघाल्यास त्याची पुर्तता करणे निविदाकारावर बंधनकारक राहील.

३४) निविदाकामाच्याअटी शर्तीमध्ये आवश्यकतेनुसार बदल करणेचा अधिकार मा. आयुक्त यांनी राखून ठेवलेला आहे.

३५) निविदाधारकास सुरक्षा अनामत रक्कम रु.२५ लक्ष करारनाम्याची मुदत संपल्यानंतर पुढील सहा महिन्यापर्यंत ठेवावी लागेल. त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

३६) मंजुर निविदाधारकास सदरचा ठेका दुसऱ्या ठेकेदारास हस्तांतर करता येणार नाही व तसे आढळून आल्यास ठेका रद्द करण्यात येईल.

३७) निविदाधारकाने पुरवठा केलेले वाहने / यंत्रसामुग्री यांचेवरील वाहनचालक व ऑपरेटर तसेच पुरविण्यात आलेल्या मनुष्यबळ यांना ओळखपत्र देण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहिल.

मिरा-भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर

३८) निविदाधारकाचे कर्मचारी यांना मनपाच्या कायमस्वरुपी सेवेकरीता हक्क सांगता येणार नाही. अथवा कोणताही दावाकरता येणार नाही.

३९) ऐन कार्यवाही सुरु असताना वाहन नादुरुस्त झाल्यास तात्काळ पर्यायी वाहन उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहिल व त्याकरीता वाढीव देयक अदा केले जाणार नाही.

४०) कार्यवाहीसाठी पुरवठा केलेल्या मनुष्यबळ, वाहन इत्यादी साहित्य यांचा तपशिल कारवाई नंतर त्वरित लेखी स्वरुपात संबंधित प्रभागाचे सहाय्यक आयुक्त तसेच अतिक्रमण व अनाधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग यांच्याकडे देणे बंधनकारक राहील. अन्यथा त्याचे देयक अदा केले जाणार नाही.

सदर कराराच्या सर्व अटीशर्ती आम्ही संपुर्णपणे मान्य करुन त्याकरिता उभयपणे सह्या करण्यात येत आहे.

सदर करारनामा आज दि. ०१ / ८ /२०२३ रोजी चांगल्या मनस्थितीत लिहुन दिला आहे.

| करारनामा लिहून देणार | करारनामा लिहून घेणार |
|---|---|
| For SHREE BALAJI TRANSPORT<br>Proprietor | (मारुती गायकवाड)<br>उप-आयुक्त (अतिक्रमण निर्मुलन)<br>मिरा भाईंदर महानगरपालिका |

समक्ष

| | |
|---|---|
| (दिपक खांबीत)<br>शहर अभियंता<br>मिरा भाईंदर महानगरपालिका | (अनिकेत मानोरकर) 01/08/23<br>अतिरिक्त आयुक्त-१<br>मिरा भाईंदर महानगरपालिका |

सन 2023 /2024 करारनामा नोंदवही
अनुं. क्र ७२६ दि. 3 / 08 / 23 अन्वये
नोंद करणेत आली

महापालिका सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका